रे.दि.मु. क्र. १०७/२०२३
वनिता वि. कार्यकारी अभियंता
निशाणी क्र. ३५ लगत

**वादीतर्फे साक्षीदार विकास विठ्ठल शिंदे**

**यांचा उलटतपास शपथेवर प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्री. एस.पी.भालेराव यांचेमार्फत सुरु:–**

१. आज रोजी मला न्यायालयात येण्यासाठी न्यायालयाचे साक्षी समन्स आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी आज रोजी न्यायालयामध्ये वनिता शिंदे यांच्या सांगण्यावरुन साक्षीसाठी आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, वनिता शिंदे हे माझे जवळचे नातेवाईक आहेत. साक्षीदार सांगतात की, ते शेजारी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, उत्तम शिंदे आणि माझा दोस्ताना चांगला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वनिता शिंदे यांना नुकसान भरपाई मिळावी असे मला वाटते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचा फायदा व्हावा असे मला वाटते. साक्षीदार सांगतात की, त्यांचे नुकसान माझ्यासमोर झालेले आहे. वनिता शिंदे व माझ्या शेतामध्ये ५ फुटाचा बांध आहे. हे म्हणणे खरे नाही की, ताराची घर्षण होऊन आग लागली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलमधील अंतर जास्त आहे हे मी खोटे सांगत आहे. दोन पोलमधील अंतर किती असावे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, ड्रीप व ऊस जळाले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तलाठी, मंडळ अधिकारी यांनी पंचनाम्यावर माझ्या कोऱ्या कागदावर सह्या घेतल्या. साक्षीदार सांगतात की, जागेवर सह्या घेतल्या होत्या. पंचनाम्याच्या दिवशी कोणता वार होता हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2025.07.17 11:09:59 +0530

दिनांकः १६.०७.२०२५

**(आर. टी. इंगळे)**
सह दिवाणी न्यायालय व स्तर, परंडा.